जिल्हा ... ,सहकारी संस्था,
... कार्यालय
आवक ... 4 JAN 2018
आवक ... 8348
...
(1406)

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१) खालील आदेश.

2008

जा.क्र./सनिवि/का.क.७८(१)/आदेश/बि.भ.रे../सन-१८
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा- इस्लामपुर
यांचे कार्यालय, इस्लामपुर
दिनांक:- ०४/०१/२०१८

वाचले :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८(१)(चार)
२) बिचुद ,भवानीनगर -रेठरे हरणाक्ष सहकारी पाणी पुरवठा संस्था संस्था मर्या. बिचुद-भवानीनर या संस्थेकडील दिनांक ,२१/७/१७ , २५/९/२०१७ व दिनांक १०/१०/१७ चे पत्र
३) या कार्यालयाकडील जा.क्र.सनिवा/कक्ष-१/पा.पुरवठा /७७ अ नोटीस/ सन-२०१७ ,दि ६/११/२०१७ ची नोटीस
४) यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बु. यांचेकडील दि. १८नोव्हे/२०१७ चे म्हणने

**प्रस्तावना :-**

ज्याअर्थी बिचुद ,भवानीनगर -रेठरे हरणाक्ष सहकारी पाणी पुरवठा संस्था संस्था मर्या. बिचुद-भवानीनर ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था असून तिचे कार्यक्षेत्र बिचुद भवानीनगर व रेठरेहरणाक्ष या गावापूरते मर्यादित आहे. सदर संस्था या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येत असलेने सदर संस्थेवर कारवाई करणेचा अधिकार या कार्यालयास आहे.

ज्याअर्थी बिचुद ,भवानीनगर -रेठरे हरणाक्ष सहकारी पाणी पुरवठा संस्था संस्था मर्या. बिचुद-भवानीनर या संस्थेचे सदस्य श्री राजाराम गुंडा शिदे रा. रेठरेहरणाक्ष यानी संचालक पदाचा राजीनामा दिनांक २१/७/२०१७ रोजी संस्थेकडे दिला होता. सदरचा राजीनामा संस्थेचे संचालक मंडळ सभा दिनांक १९/६/२०१७ रोजी मंजुर केला होता. तसेच संस्थेचे इतर ९ सदस्यांनी दिनांक १२/९/२०१७ रोजी नामे दिले होते त्यास अनुसरुन दिनांक २५/९/२०१७ रोजी मासिक सभा संस्थेने बोलविली होती. तथापी सदर सभेस सर्व सदस्य व चेअरमन व्हा. चेअरमन गैरहजर होते. त्यामुळे कोरम अभावी सदरची सभा रदद करणेत आली होती. त्यानंतर संस्थेचे चेअरमन श्री विजयकुमार सिताराम पवार रा. बिचुद यांनी चेअरमनपदाचा राजीनामा संदर्भ क्रमांक २ नुसार दिनांक १०/१०/२०१७ रोजी संस्थेकडे दिले , संस्थेने संस्थेने संदर्भ क्रमांक २ नुसार सदरचा राजीनामा या कार्यालयास सादर केला, अशा प्रकारे संस्थेचे १० सदस्यांनी राजीनामे दिलेने संस्थेचे दैनंदिन कामकाज ठप्प झाले आहे.

ज्याअर्थी बिचुद ,भवानीनगर -रेठरे हरणाक्ष सहकारी पाणी पुरवठा संस्था संस्था मर्या. बिचुद-भवानीनर या संस्थेच्या १० संचालकांनी राजीनामे दिले आहेत. संस्थेचे उपविधी क्रमांक - ३८ मधील तरतुदीनुसार सभा कोरम होत नाही.

ज्याअर्थी बिचुद ,भवानीनगर -रेठरे हरणाक्ष सहकारी पाणी पुरवठा संस्था संस्था मर्या. बिचुद-भवानीनर या संस्थेच्या तत्कालीन पोटनियम क्र. ४५ नूसार समिती सदस्य संख्या १३ असून, निवडून आलेले १३ सदस्य आहेत. दिनांक १०/१०/२०१७ अखेर एकुण १० संचालकांनी राजीनामा दिलेमुळे रिक्त जागांची संख्या एकण १० झाली असून उर्वरीत ३ संचालक कार्यरत आहेत.

ज्याअर्थी वाचले क्रमांक ३ अन्वये सदर संस्थेच्या संचालक मंडळाच्या गणपूर्ती अभावी सभा होत नाहीत . संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाण्यासाठी सध्या कोणीही नाही त्यामुळे संस्थेचे संचालक मंडळ, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) (चार ) अन्वये बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती का करणेत येवू नये या बाबतची नोटीस देणेत आली होती. सदर नोटीसीची सूनावणी या कार्यालयात दिनांक २०/११/२०१७ रोजी घेणेत आली होती.

ज्याअर्थी सदर नोटीसीस संस्थेच्या सध्याच्या १३ संचालकांना पोहच देय डाकेने पाठविणेत आल्या होत्या तथापी सदर संचालकापैकी ते स्वत: किंवा त्यांचे प्रतिधिनी सुनावणी तारखेस हजर राहिले नाहीत. सुनावणी तारखेस कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे बु. ता. कराड जि. सातारा यांचे प्रतिनिधी हजर राहुन लेखी म्हणने दिले की सदरची संस्था ही कारखाना पुरस्कृत असुन संस्थेचे संचालकांनी संस्थेकडे राजीनामे दिले असलेने या कार्यालयास कायदयातील व पोटनियमाती तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत कळविले आहे . तसेच संस्थेचे सचिव हजर होते त्यानी सांगितले की दिलेले राजीनामे योग्य असुन आपले मार्फत योग्य ती कारवाई करणेबाबत सांगणेत आले .

ज्याअर्थी अस्तित्वातील ३ संचालक व राजीनामा दिलेले १० संचालक यांनी संदर्भ क्रमांक ३ नुसारची नोटीस पोहचुनही नोटीसाबाबत कोणताही लेखी अगर तोडी खुलासा केलेला नाही. नोटीस मागे घेणेबाबत कळविले नाही.

सबब संस्थेच्या सदस्यांच्या १३ जागा पैकी १० जणांनी राजीनामा दिलेने एकूण १० जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे उर्वरीत ३ सदस्यांच्या उपस्थितीमुळे संचालक मंडळाची गणपूर्ती होणार नाही असे माझे स्पष्ट मत झाले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७८ (१) (चार) नूसार संचालक मंडळ सभेची गणपूर्ती होत नसलेने संचालक मंडळ बरखास्त का करणेत येवू नये अशा प्रकारच्या संचालक मंडळाला दिलेल्या

. २ .

Scanned by CamScanner

नोटीसी बाबतीत सदर संस्था कारखाना पुरस्कृत असलेने सदरची नोटीस यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रंठरे बु. ता. कराड जि. सातारा यांचेकडून अभिप्राय मागविणेत आले होते. त्यांचेकडील संदर्भ ४ नुसार कारखान्याने अभिप्राय दिला आहे. उपरोक्त संस्थेच्या पोटनियमानूसार गणपूर्ती होत नसलेने संचालक मंडळ सभा होत नाहीत अगर घेतलेल्या सभा बेकायदेशीर होतील या कारणास्तव संचालक मंडळ बरखास्त करुन संस्थेचे कामकाजाचे दृष्टीने सोईचे व्हावे म्हणुन प्रशासक मंडळ नियुक्ती करीत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

-:- आ दे श -:-

मी ए. व्ही. डफळे , सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा - इस्लामपुर. ता. वाळवा जि. सांगली . महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ (१) नूसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार महाराष्ट्र स. का.क. ७८ (१) (चार) प्रमाणे संस्थेच्या संचालक मंडळ सभेची गणपूर्ती होत नसलेने बिचुद ,भवानीनगर -रेठरे हरणाक्ष सहकारी पाणी पुरवठा संस्था संस्था मर्या. बिचुद-भवानीनर या सहकारी संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी खालील प्रमाणे प्रशासक मंडळाची नियुक्ती करीत आहे.

१ श्री राजगोंडा नाना पवार , कारखना प्रतिनिधी - अध्यक्ष

२.श्री राजाराम नाना पवार , रा. बिचुद. संस्था प्रतिनिधी - सदस्य

३.श्री दिनकर बिरु कोळेकर ,रा. रेठरेधरण , संस्था प्रतिनिधी -सदस्य

सदरचा आदेश आज दिनांक ०४/०१/२०१८ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला असे.

ठिकाण :- इस्लामपुर

दिनांक :- ४/१/२०१८

( अमोल व्ही. डफळे )
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, वाळवा-इस्लामपूर.

प्रति,

१ श्री. संपत दादु औताडे , रा. भवानीनगर

२ श्री सुरेश रामराव पाटील , रा. भवानीनगर

३ श्री सुरेश संभाजी पाटील ,रा.येडेमच्छिंद्र

४ श्री बाबासो वसंत पाटील ,रा.येडेमच्छिंद्र

५ श्री विजयकुमार सिताराम पवार , बिचुद

६ श्री राजाराम गुंडा शिंदे रा. रेठरेहरणाक्ष

७ श्री बाबासो खाशाबा पवार रा. रेठरेहरणाक्ष

८ श्री उदय महादेव पवार रा. रेठरेहरणाक्ष

९ श्रीमती कुसुम पांडुरंग चंद रा. भवानीनगर

१० श्रीमती इंदुबाई यशवंत माहिते रा. भवानीनगर

११ श्री अधिकाराव नाना मानकर ,रा.येडेमच्छिंद्र

१२ श्री जयसिंग खाशाबा कोळेकर रा. रेठरेहरणाक्ष

१३ श्री जगन्नाथ गुलाब माळी, भवानीनगर

**प्रत -माहितीसाठी व कार्यवाही साठी**

१ प्रशासक मंडळ अध्यक्ष , श्री राजगोंडा जनगोंडा पाटील , कारखाना प्रतिनिधी

२ प्रशासक मंडळ सदस्य श्री राजाराम नाना पवार रा. बिचुद , व श्री दिनकर बिरु कोळेकर ,रा. रेठरेहरणाक्ष आपणास कळविणेत येते , आपण संस्थेच्या दप्तराचा चार्ज सत्वर घेऊन चार्ज चादीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा व संस्थेच्या प्रशासकीय कामकाजास सुरुवात तात्काळ करावी .

३ सचिव, बिचुद ,भवानीनगर -रेठरे हरणाक्ष सहकारी पाणी पुरवठा संस्था संस्था मर्या. बिचुद-भवानीनर ता.वाळवा , जि.सांगली.

४ शाखा इन्स्पेक्टर , शाखा भवानीनगर
सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.सांगली.

**प्रत -माहितीसाठी सविनय सादर...**

१ मा.जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था, सांगली.

२ मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक , वर्ग-१ , सहकारी संस्था, सांगली.

३ मा. कार्यकारी संचालक सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सांगली.

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था, वाळवा-इस्लामपूर.

Scanned by CamScanner